राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

# महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कालमर्यादा १०/०७/२०२२**

जा.क्रं.विकापु/आस्था-१/२०२२/२९५६

दिनांक : 24 JUN 2022

प्रति,

संचालक/ प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /
शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था/.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

विषयः-स्थायित्व प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करताना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत...

संदर्भ :-१.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचा यांचे पत्र क्र.५/आस्था/स्थायी प्रमाणपत्र/२०२२/२९३ दिनांक २३/०६/२०२२
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.स्थाप्रप-१४१४/(प्र.क्र.७३/१४)/१३-अ दि.११/०९/२०१४

उपरोक्त संदर्भिय पत्रांचे अवलोकन करावे. आपल्या संस्थेतील ज्या गट अ व गट ब राजपत्रित अधिकारी यांना अद्याप स्थायित्व प्रमाणपत्र मिळालेले नाही अथवा अद्यापही प्रस्ताव संचालनालयांस सादर केलेला नाही अश्या सर्व पात्र गट अ व ब अधिकारी यांचे प्रस्ताव संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन , सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रांत माहिती भरुन दिनांक १०/०७/२०२२ पुर्वी व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावेत.

उपरोक्त प्रपत्र तयार करतांना ते सकल मराठी फॉन्ट,एक्सेल शिट मध्ये तयार करण्यात यावे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
दूरध्वनी क्र.022-68597405/425/472 3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
ई-मेल--desk5@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्र.५/आस्था/स्थायी प्रमाणपत्र/२०२२/ २ ९ ३ दिनांक 23 JUN 2022

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई /पुणे/ नाशिक /औरंगाबाद/अमरावती/नागपूर

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय :- स्थायीत्व प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत
संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक
क्र.स्थाप्रप-१४१४/(प्र.क्र.७३/१४)/१३-अ दि.११.०९.२०१४

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये शासनाने स्थायित्व प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत कोणकोणत्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर शासन परिपत्रकान्वये प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण करणा-या व पुढील शर्तींची पूर्तता करीत असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांपैकी गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांच्या बाबतीत संबंधित नियुक्ती प्राधिका-याने तसेच गट-ब (अराजपत्रित ) गट —क व गट-ड कर्मचा-यांच्या बाबतीत संबंधित कार्यालय प्रमुखाने स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागांतर्गत असलेल्या शासकीय संस्थांतील गट-क व गट-ड च्या कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र संबंधित कार्यालयप्रमुखांनी निर्गमित करावे तसेच गट-अ व गट-ब (राजपत्रित ) अधिका-यांना स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी शासनास आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्यासाठी संबंधित अधिका-यांचे खाली नमूद कागदपत्रांसह प्रस्ताव संचालनालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावेत.

१) ज्या पदावर अधिका-यांची नियुक्ती झाली आहे त्या नियुक्ती आदेशाची छायांकित प्रत व सेवेत रुजू झाल्याची व परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याची नोंद असलेल्या सेवापुस्तकाच्या संबंधित पृष्ठाची प्रत
२) नियुक्ती झाल्यानंतर संबंधित वैद्यकीय मंडळामार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली असल्याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात करण्यात येऊन त्या नोंदीची छायांकित प्रत
३) अधिका-यांच्या प्रथम नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्यानंतरच्या ३ वर्षांचे गोपनीय अहवाल ( गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती प्राचार्यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात )

उपरोक्त बाबींची पूर्तता झाली असल्याची तपासणी आपल्या स्तरावर करावी व सर्व कागदपत्रांची पूर्तता करीत असलेल्या अधिका-यांचेच स्थायीत्व प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्रात सादर करण्यात यावेत. तसेच प्रस्तावाची soft copy सुध्दा sakal marathi हया font मध्ये desk5@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर पाठविण्यात यावी

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

D:\data\leenafolder\sthaicertificate\circular1.docx

# प्रपत्र

| अनु क्र. | अधिका-याचे /अध्यापकांचे पूर्ण नाव व सध्याचे पदनाम | मूळ पदावरील प्रथम नियमित नियुक्तीचा शासन निर्णय व दिनांक (शासन निर्णयाची प्रत) | नियुक्ती विहीत मार्गाने झाली आहे का? | वैद्यकीय प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | मागासवर्गीय उमेदवार असल्यास जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे का? असल्यास क्रमांक व दिनांक | परिविक्षा कालावधी पूर्ण झाला आहे का? असल्यास दिनांक व आदेशाची प्रत | रुजू दिनांकापासून पहिल्या ३ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी (कालावधी व त्यासमोर प्रतवारी) | स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येणा-या पदाचे पदनाम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

सहसंचालक